नि. दि. दा. क्र. १२०/२००९
बंडु वि. शादुला व ईतर

**<u>नि. क्र. ८६ खालील पारित आदेश</u>**
(पारित दिनांक ०८/ ०७/२०२२)

प्रतिवादींनी त्यांच्याविरूध्द पारित झालेला उलटतपास काही नाहीचा आदेश रद्द करून मिळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

२. प्रतिवादींचे थोडक्यात कथन असे आहे की, प्रतिवादी क्र. २ ला दमा असल्याने तो आजारी होता. त्यामुळे तो न्यायालयात येऊ शकला नाही. त्याने त्याचा मुलगा परसराम यास मुक्त्यार म्हणुन नेमले आहे. तो शेताच्या कामात व्यस्त असल्यामुळे तो देखील न्यायालयात हजर राहु शकला नाही. प्रतिवादींचे वकील उलटतपास काही नाही असा आदेश झाला त्यादिवशी ईतर न्यायालयात कामकाजामध्ये व्यस्त होते. म्हणुन त्यांच्या विरूध्द उलटतपास काही नाही असा आदेश पारित झाला आहे. सदरचा खटला हा शेताबाबत आहे. प्रतिवादींचे न्यायालयात उलटतपासाच्या दिवशी गैरहजर राहणे जाणुन बुजुन नाही. प्रतिवादींतर्फे वादीच्या साक्षीदारांना उलटतपास घेणे आवश्यक आहे. प्रतिवादींचे वकील हा अर्ज मंजुर झाल्याच्या नंतर विना विलंब एकाच दिवशी वादीच्या साक्षीदारांचा उलटतपास घेतील. म्हणुन त्यांच्याविरूध्द पारित झालेला उलटतपास नाहीचा आदेश रद्द करून मिळावा अशी विनंती केली.

३. वादीच्या वकीलांनी सदर अर्जावर नि. क्र. ८९ नुसार म्हणणे दाखल केलेले आहे व सदर अर्जास विरोध दर्शवला आहे. त्यांनी त्यामध्ये असे कथन केले आहे की, या दाव्यातील प्रतिवादी क्र. २ यांनी याच मालमत्तेबद्दल वादीविरूध्द माननीय दिवाणी न्यायाधीश व. स्तर यांच्या न्यायालयात दिवाणी दावा क्र. १२७/२०१२ दाखल केलेला आहे. प्रतिवादींनी त्या दाव्यात एकतर्फा निकाल घेण्याचा प्रयत्न केला. परंतु ते सफल ठरले नाहीत. प्रतिवादी हे जाणुन बुजुन दावा चालवण्यासाठी विलंब करत

आहेत. सदरचा खटला हा निकालासाठी प्रलंबित आहे. म्हणुन सदरचा अर्ज खारीज करण्यात यावा अशी विनंती केली.

४. अभिलेखाचे अवलोकन केले, दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. मान्य वस्तुस्थिती अशी आहे की, सदर दाव्यामध्ये वादींनी त्यांचे सर्व साक्षीदार दिले आहेत. परंतु प्रतिवादींतर्फे दाव्यामध्ये त्यांचा उलटतपास घेण्यासाठी कोणीही हजर राहिले नाही. म्हणुन त्यांच्या विरूध्द उलटतपास काही नाही असा आदेश पारित करण्यात आला आहे. त्यानंतर प्रतिवादींनी पुरावा दिला नाही म्हणुन त्यांच्या विरूध्द प्रतिवादींचा पुरावा काही नाही म्हणुन देखील नि. क्र. १ वर आदेश पारित करण्यात आला. त्यानंतर प्रकरण युक्तीवादासाठी ठेवण्यात आले. दरम्यानच्या काळात कोव्हीड–१९ चा प्रादुर्भाव असल्यामुळे प्रकरणात कुठलीही कार्यवाही झाली नाही. त्यानंतर प्रतिवादींनी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

५. सदरचा दावा हा शेती बाबत आहे. अभिलेखाचे अवलोकन केले असता व उभयपक्षाचा युक्तीवाद ऐकल्यानंतर असे दिसुन येते की, वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये दावा शेताबाबत ईतर न्यायालयात देखील वाद प्रलंबित आहे. वादीने प्रतिवादींविरूध्द शाश्वत मनाई हुकूम मिळण्यासाठी, खरेदीख रद्द करून मिळण्यासाठी व दिवाणी दावा क्र. ४६९/२००६ मध्ये एकतर्फा झालेली डिक्री वादीच्या हक्कावर बंधनकारक नसल्याचे घोषीत करण्याबाबत सदरचा दावा दाखल केला आहे. प्रतिवादींनी सदर दाव्यास नि. क्र. ६७ प्रमाणे उत्तर दाखल केलेले आहे. त्यानंतर पुर्वपिठासीन अधिकारी यांनी एकुण आठ मुद्दे कायम केलेले आहेत. त्यामुळे हा दावा गुणवत्तेवर निकाली काढण्यासाठी प्रतिवादींतर्फे वादीच्या साक्षीदारांचा उलटतपास घेणे आवश्यक वाटते.

६. अर्जामधील दिलेले कारण लक्षात घेता हा अर्ज मंजुर करणे न्यायोचित आहे. वस्तुस्थितीप्रमाणे प्रतिवादीकडुन दावा चालवण्यास विलंब झालेला आहे. त्याबद्दल त्यांच्यावर खर्च बसवुन त्यांना उचीत न्यायाच्या दृष्टीकोनातुन उलटतपास घेण्याची संधी देणे योग्य आहे. करीता वरील चर्चेच्या अनुषंगाने उचीत न्यायदानाच्या दृष्टीकोनातुन

उभपक्षातील वादाचे गुणवत्तेवर निराकरण करण्यासाठी मी खालील प्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. प्रतिवादींविरूध्द पारित झालेला उलटतपास काही नाही व त्यांच्याविरूध्द पारित झालेला उलटतपास बंदचा आदेश रू.१,५००/– खर्च देण्याच्या अटीवर रद्द करण्यात येतो.

३. प्रतिवादींनी खर्चाची रक्कम वादीला द्यावी.

दिनांक ०८/०७/२०२२

(डी. बी. गुट्टे)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र. १ गंगाखेड.